# ह्रद्य मिलाफ... कर्तृत्व आणि दातृत्वाचा!

शैलेंद्र परदेशी




## ■ 'मटा हेल्पलाइन'च्या विद्यार्थ्यांना निधी सुपूर्द


म. टा. प्रतिनिधी ■ पुणे
matapune@indiatimes.com


कोणाला टेलरिंग मशिनच्या आवाजात करावा लागलेला अभ्यास, तर कोणाला दिवसभरचा गोंगाट शांत झाल्यानंतर पहाटे तीन वाजता उठून करावी लागलेली ज्ञानसाधना, भाजीविक्रेते-मोलमजुरी करणाऱ्या आई-वडिलांनी उपसलेल्या कष्टांना न्याय देण्याची जिद्द कोणाकडे, तर परिस्थितीचा सामना करीत गगनाला गवसणी घालण्याची उमेद कोणाकडे...

... खडतर परिस्थितीतही दहावीच्या परीक्षेत ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळविणाऱ्यांची यशोगाथा सांगत त्यांच्या कर्तृत्वाला दातृत्वाची साथ देण्याचे आवाहन 'महाराष्ट्र टाइम्स'ने केले आणि त्याला पुणेकरांनी लाखमोलाचा प्रतिसाद दिला. 'मटा हेल्पलाइन'च्या उपक्रमांतर्गत जमलेला निधी त्या-त्या गुणवंतांना सुपूर्द करण्यासाठी रविवारी पुण्यात झालेल्या ह्रद्य सोहळ्यात कर्तृत्व नि दातृत्वाचा आगळा मिलाफ झाला! प्रतिकूल परिस्थितीतून केंद्रीय नियोजन आयोगाच्या सदस्यपदी भरारी घेणारे पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव या वेळी प्रमुख पाहुणे होते.

अनिकेत कुंभार, सुप्रिया आगम, ऋतुजा जगताप, मेनका लष्करे आणि शैला जाधव यांची यंदाच्या 'मटा हेल्पलाइन'साठी निवड करण्यात आली होती. या पाचही विद्यार्थ्यांना या सोहळ्यात डॉ. जाधव यांच्या हस्ते चेक प्रदान करण्यात आले.

'योग्य व्यक्तींना योग्य वेळी पाठिंबा देण्यासाठी पुणेकर आवर्जून उभे राहतात, हेच हेल्पलाइनने सिद्ध केले आहे. तसेच, 'मटा हेल्पलाइन'च्या विश्वासार्हतेवरही सातत्याने दुसऱ्या वर्षी शिक्कामोर्तब झाल्याचे स्पष्ट होत आहे,' असे डॉ. जाधव यांनी आवर्जून सांगितले.

### यशाचा कानमंत्र

'या विद्यार्थ्यांच्या रूपात मी स्वतःलाच पाहतो,' अशा शब्दांत जाधव सरांनी भावना व्यक्त केली. 'तुमचे ध्येय ठरवा, त्यासाठी कठोर परिश्रम करा, दुर्दम्य इच्छाशक्ती बाळगा, वेळेचे व्यवस्थापन सांभाळा, शॉर्टकट टाळा, जे जे उत्तम, उन्नत त्याचा ध्यास घ्या, आई-वडिलांचा आदर राखा, सामाजिक बांधिलकी जपा आणि मानसिकता बदलण्याची तयारी ठेवा...' असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना यशाचा कानमंत्र दिला.

विशेष वार्तांकन ■ पान ७